सन २०१७-१८ पासून गट अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिका-यांचे कार्यमूल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने लिहिणेबाबत.

वाचा :-

१. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर१२११/प्र.क्र.२५७/तेरा.दि.०२.०२.२०१७

२. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर१२११/प्र.क्र.२५७/तेरा.दि.०७.०२.२०१८

३. संलेवको यांचे परी. क्र.संलेको०३.२०१८/गोअकक्ष/सअ२/गोअपरिपत्रक/२०१७-१८/५७ दि.२८.०३.२०१८

क्र.स्था.१८/ब/कार्यमूल्यमापन अहवाल २०१७-१८ /ल.ले (व)/ ७६०. दिनांक : ०३.०४.२०१८ ५/४/१८

संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा,
६ वा मजला,कोकण भवन ,सी बी डी बेलापूर,
नवी मुंबई ४००६१४

## परिपत्रक

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सवंर्गातील "गट-अ" अधिका-यांचे सन २०१६-१७ व "गट-ब"(राजपत्रित ) अधिका-यांचे सन २०१७-१८ या कालावधीपासून कार्यमूल्यमापन अहवाल हे महापार संगणक ( www.mahapar.gov.in ) प्रणाली व्दारे online लिहावयाचे शासनाने योजिले आहे.

त्यानुसार सन २०१७-१८ या कालावधीतील संचालक ते सहाय्यक लेखाअधिकारी यांचा कार्यमूल्यमापन अहवाला च्या कालावधीसंबंधीचा workflow हा महापार संगणक प्रणालीवर online तयार करुन आस्थापना विषयक परिशिष्ट "अ" ची माहिती भरुन संबंधित अधिका-यांच्या Login ID वर पाठविण्याची जबाबदारी ही संचालनालयाच्या स्तरावरुन खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यालय | देण्यात आलेली जबाबदारी |
|---|---|---|
| १. | संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोंकण भवन, नवी मुंबई | १.म वि व ले से संवर्गातील "गट-अ" संचालक ते सहाय्यक संचालक अधिका-यांचे workflow तयार करणे. व परिशिष्ट अ मधील माहिती भरुन संबंधित अधिका-यांच्या Login ID वर पाठविणे.<br>२. म वि व ले से सवंर्गातील "गट-ब" अधिका-यांचे परिशिष्ट- अ ची माहिती भरण्यासाठी सर्व विभागीय सहसंचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयांवर नियंत्रण व कार्यमूल्यमापन अहवालासंबंधी कार्यवाही पूर्ण करण्याची जबाबदारी |
| २. | कोकण ,पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागीय सहसंचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय | यांनी त्यांच्या विभागातील कार्यरत असलेले तसेच जिल्हा स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयात कार्यरत असलेले "गट-ब" च्या अधिका-यांचे workflow तयार करणे. व परिशिष्ट- अ मधील माहिती भरुन संबंधित अधिका-यांच्या Login ID वर पाठविणे. |

(प्रताप मोहिते )
संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा
महाराष्ट्र राज्य